# मराठी पुस्तके वाचा ऍपलच्या आयपॉडवर

सकाळ न्यूज नेटवर्क (snn.nsk@esakal.com)

Wednesday, September 01, 2010 AT 12:15 AM (IST)

Tags: marathi book, online, bookganga, global marathi, ipod, snn




मुंबई - इंग्रजीतील ऍमेझॉन डॉट कॉमच्या धर्तीवर मराठीतील पुस्तके इंटरनेटवर आता विकत घेता येणार आहे. "बुकगंगा डॉट कॉम' या अनोख्या संकेतस्थळाचे उद्‌घाटन नुकतेच झाले असून, ऍपल कंपनीच्या आयपॉडवर मराठीतील नामवंत पुस्तके वाचता येणार आहेत.

"ग्लोबल मराठी' या संकेतस्थळाचे मुख्य संचालक मंदार जोगळेकर यांनी ही अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे. एशियाटिक सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अरुण टिकेकर यांच्या हस्ते या अनोख्या उपक्रमाचे उद्‌घाटन झाले. या उपक्रमाची जोगळेकर यांनी माहिती दिली. पुस्तकांची विनामूल्य माहिती वाचून ग्राहकांना क्रेडिट कार्डच्या साहाय्याने ही पुस्तके विकत घेता येणार आहे. आयपॉड या अत्याधुनिक संगणकावर पुस्तकातील मजकूर ग्राहकाला वाचता येतो. अशा आयपॉडवर वाचकांनी पुस्तकांची माहिती घेऊन "बुकगंगा'कडे मागणी केली, तर ते पुस्तक जगात कुठेही उपलब्ध करून दिले जाईल. या आधुनिक तंत्रामध्ये प्रकाशकांना दुकान, वितरण असे खर्च नसल्याने पुस्तके ग्राहकांना कमी किमतीत विकता येतील. आयपॉडवर ग्राहकाने पुस्तक निवडल्यानंतर "माय विश्‍व' या संचालक कंपनीच्या बॅंक खात्यात पैसे जमा करता येतील किंवा क्रेडिट, डेबिट कार्डाने पैसे पोचवता येतील. "ई-बुक' खरेदी केल्यावर ग्राहकाला पुस्तक डाऊनलोड करण्यासाठी कोड दिले जाईल, त्याचा वापर करून पुस्तक वाचता येईल. आयपॉड संगणकावर पुस्तकाचा फॉन्ट कमी जास्त करण्याची सुविधा आहे. या नव्या उपक्रमात विश्‍वकोश, संस्कृती कोश अशी संदर्भ ग्रंथांची पुस्तकेही उपलब्ध करून देण्याचा मनोदय जोगळेकर यांनी व्यक्त केला. मराठीबरोबरच बंगाली, तेलगू, तमीळ तसेच हिंदी भाषेतील "ई-बुक' उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.